पुण्यनगरी पु-पा-१.

# पेट्रोल पंपावर झालेल्या वादातून मीरा रोडमध्ये तरुणाचा खून, ९ जणांना अटक

**मीरा रोड :** मीरा रोड परिसरातील पेट्रोल पंपावर झालेल्या वादातून एका तरुणाचा खून करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी काही तासांतच ९ जणांना अटक केली.

हर्ष राज व आयुष भानुप्रताप सिंग यांच्यामध्ये वाद झाला होता. हा वाद सोडवण्यासाठी अंकुश राज याने मध्यस्थी केली होती. त्यानंतर अंकुश राज व आयुष सिंग यांच्यामध्ये पुन्हा वाद झाला. या वादात अंकुश राज याचा आयुष सिंग याने व त्याच्या सहकाऱ्यांनी चाकूने वार करून सोमवारी सायंकाळी खून केला. अंकुश राज याची आई रुपादेवी राजेशकुमार राज यांनी दिलेल्या तक्रारीवरून मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ४ तासांत तपास करत सर्वप्रथम पाच आरोपींना ताब्यात घेतले व रात्री उशिरा ४ आरोपींना अटक करण्यात आली. यामध्ये आरोपी आयुष भानुप्रसाद सिंग, आकीब खालीद अन्सारी, शेख फरहान नजरे आलम, अरमान हबीब लदाफ, हैदर पैगंबर पठाण, अश्पाक अख्तर मन्सूर, मेहताब रहीमुद्दीन खान, अमित सौरव सिंग, सरवर हुसैन शफीकउल्ला खान यांना ताब्यात घेऊन विचारणा केली असता मृताचा मामा हर्ष राज व आरोपी आयुष भानुप्रताप सिंग यांच्यामध्ये वाद झाला होता. त्यावेळी मृत अंकुश राजेशकुमार राज याने त्यांची भांडणे सोडवल्याचा राग होता. त्यानंतर सोमवारी अंकुश राज व आयुष सिंग यांच्यामध्ये अंकुश काम करत असलेल्या ठिकाणी भांडण झाले. यावेळी अंकुश राज याने आयुष सिंग याला मारले तेव्हा आयुष याने त्याच्या मित्राला फोन करून मला मारले आहे लवकर या, असे सांगितले. त्यावेळी आयुष व त्याच्या मित्रांनी अंकुश राज याच्या छातीवर चाकूने वार करत दिवसाढवळ्या खून केला.

सकाळ पा-नं-५.

# भांडणात मध्यस्थी करणाऱ्याची हत्या

भाईंदर, ता. ३१ (बातमीदार) : भांडणात मध्यस्थी करून ते सोडवल्याचा राग मनात धरून मिरा रोड येथे सोमवारी (ता. ३०) सायंकाळी अंकुश राज या वीसवर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली होती. मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांच्या गुन्हे शाखेने अवघ्या चार तासांत गुन्ह्याची यशस्वी उकल करून नऊ आरोपींना अटक केली.

## नऊ आरोपींना अटक

आयुष भानुप्रसाद सिंग (वय १९), आकीब खालिद अन्सारी (वय २०), शेख फरहान नजरे आलम (वय १८), अरमान हबीब लदाफ (वय १८), हैदर पैगंबर पठाण (वय १८), अशपाक अख्तर मंसूर (वय २५), मेहताब रहिमुद्दीन खान (वय २२), अमित गौरव सिंग (वय २२) आणि सरवरहुसैन शफिकउल्ला खान या आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मिरा रोड येथील जांगिड सर्कल परिसरात सोमवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास अंकुश राज याच्यावर हल्ला करून त्याच्या छातीत धारदार हत्याराने भोसकण्यात आले होते. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या अंकुशला नजीकच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले; परंतु त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. हा हल्ला तीन ते चार जणांनी केला असावा, अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली होती.

अंकुश याचा मामा हर्ष राज व आरोपी आयुष भानुप्रताप सिंग यांच्यात वाद झाला होता. त्या वेळी अंकुश राज याने त्यांचे भांडण सोडवले होते. त्याचा राग आरोपीच्या मनात होता. त्यामुळे आरोपीने अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने अंकुशची हत्या केल्याचे निष्पन्न झाले. पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अविराज कुराडे यांच्या पथकाने हा तपास केला.

CamScanner

पुढारी पा.नं.७.

# झारखंडमध्ये ऑनलाईन फसवणुकीचे धडे

## मुंबई, पुण्यातील ७ लाख बँक खातेदारांचा डाटा लिक

■ जि. प. शाळेचा मुख्याध्यापक गजाआड

**ठाणे : पुढारी डेस्क**

झारखंड राज्यात ऑनलाईन फसवणुकीचे धडे देणाऱ्या जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाला गजाआड करण्यात आले आहे. सदर कारवाई मुंबई पोलीस दलाच्या माटुंगा पोलिसांनी झारखंडमध्ये केली. आरोपी मंजितकुमार आर्या (३१, रा. जि. देवघर, झारखंड) याच्या अटकेपूर्वी पोलिसांनी त्याच्या तीन शिष्यांना तुरुंगात धाडले आहे. नागरिकांना लुटण्यात शातीर असलेल्या या आरोपीकडून मुंबई व पुणे शहरातील दोन नामांकित बँकांच्या ७ लाख ६५० खातेदारांचा डाटा व लॅपटॉप, चेकबुक, ६ डेबिट कार्ड जप्त करण्यात आले, अशी माहिती मंगळवारी दै. 'पुढारी'ला पोलीस सूत्रांनी दिली.

माटुंग्यातील वसंत छेडा (६४) यांना केव्हायसी नसल्याने बँक खाते ब्लॉक झाल्याचा मेसेज पाठवण्यात आला होता. खाते ब्लॉक होईल या भीतीपोटी त्यांनी मेसेजमधील लिंकवर क्लिक करता बँकेची वेबसाईट ओपन झाली. त्यावर वैयक्तिक माहिती भरताच छेडा यांच्या बँक खात्यातून १ लाख ९ हजार ९९९ रुपये ट्रान्स्फर झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी माटुंगा पोलीस ठाणे गाठले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू असताना आरोपीने छेडा यांच्या पैशांनी दिल्लीतील एका नामांकित दुकानात खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांचे पथक दिल्लीत रवाना झाले. प्राप्त माहितीच्या आधारे परिमंडळ ४ चे उपायुक्त डॉ. प्रवीण मुंढे, एसीपी संजय जगताप, वपोनि दीपक चव्हाण, पोनि (गुन्हे) सुभाष शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दिगंबर, पगार, अंमलदार संतोष पवार, मंगेश जऱ्हाड यांनी पोलिसांनी सैफ अली उसमान (२३), मो. कलाम मो. सोहराब अन्सारी (२२, दोघेही रा. दिल्ली) यांच्या मुसक्या आवळल्या. या दोघांची कसून चौकशी केली असता त्यांनी झारखंडच्या आरोपीची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी अरुणकुमार मंडळ (२४) याला अटक केली. पोलीस कोठडीदरम्यान पोलिसांनी तिघांची कसून चौकशी केली असता त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या मंजितकुमार आर्या याचे नाव उघडकीस आले. त्यानुसार त्यालाही बेड्या ठोकण्यात आल्या.



### ३६०० जणांना पाठवल्या लिंक

**विद्युत बिल भरा अन्यथा वीजपुरवठा बंद होईल, केव्हायसी करा नाहीतर बँकेचे व्यवहार करता येणार नाहीत, अशा आशयाचे मेसेज मुंबई, पंजाब व बंगळुरूमधील ३ हजार ६०० नागरिकांना लिंक पाठवल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. या टोळीचा पर्दाफाश झाल्याने अनेक गुन्हे उजेडात येण्याची शक्यता माटुंगा पोलिसांनी वर्तली असून त्या अनुषंगाने पुढील तपास पोलीस करत आहेत.**

# मेट्रो कारशेडविरोधात सुनावणी सुरू

## आयुक्तांकडे ११ ७६ हरकती दाखल

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

एमएमआरडीएने भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावातील ग्रामस्थांच्या ३२ हेक्टर जागेत मेट्रो कारशेड प्रस्तावित केली असून त्याविरोधात ग्रामस्थांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे ११७६ हरकती दाखल केल्या. त्यावरील सुनावणी येत्या सोमवार ऐवजी मंगळवारपासून सुरु करण्यात आली असून ती २ फेब्रुवारीपर्यंत सुरु राहणार असल्याचे कोकण विभागाच्या नगर रचना विभागाचे सहसंचालक जितेंद्र भोपळे यांनी सांगितले.

सुनावणी पालिका मुख्यालयातील स्थायी समिती सभागृहात भोपळे यांच्याच नियंत्रणाखाली आयोजित करण्यात आली आहे. तब्बल ११७६ हरकतींवर सुनावणी घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी हि सुनावणी कोकण विभागीय कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या ठिकाणी ग्रामस्थांना उपस्थित राहणे गैरसोयीचे ठरणार असल्याने सुनावणी मिरा-भाईंदर शहरातच आयोजित करण्याची मागणी त्यांनी आ. प्रताप सरनाईक यांच्या माध्यमातून भोपळे यांच्याकडे केली होती. ती मान्य करीत सुनावणीचे आयोजन पालिका मुख्यालयात करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एमएमआरडीएकडून मेट्रो प्रकल्प क्रमांक ७ व ९ करीता प्रस्तावित कारशेड भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावांतील ग्रामस्थांच्या ३२ हेक्टर जागेत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. एमएमआरडीएने पोलीस बंदोबस्तात त्याचे सर्वेक्षण व जमिनीची तपासणी देखील केली. तत्पुर्वी हि कारशेड नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानामागून जाणाऱ्या रस्त्यावर प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र हि जागा केंद्रीय मिठ विभागाची असल्याने त्यावर कारशेडच्या बांधकामाला परवानगी मिळणार असल्याचा दावा करीत कारशेड परस्पर मुर्धा, राई व मोर्वा गावातील जमिनीवर प्रस्तावित केली.

सकाळ पृ-५ा-१०

# वृक्षांचे विद्रूपीकरण रोखा!

## वसई-विरार महापालिकेने दुकानदारांना बजावली नोटीस

वसई, ता. ३१ (बातमीदार) : वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यातच सतत होणाऱ्या अतिक्रमणामुळे मुळापासून ते शेंड्यापर्यंत वृक्षांचा श्वास गुदमरत आहे. यामुळे शहरातील वृक्षांचे संवर्धन व्हावे, यासाठी महापालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार शहरात तसेच रस्त्यालगत असलेल्या वृक्षांचे विद्रूपीकरण रोखा, तसेच त्यांचे संवर्धन करा, अशा आशयाची नोटीस दुकानदार, व्यापारीवर्गाला बजावण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे.




वसई : महापालिकेच्या पथकाकडून झाडांचे सर्वेक्षण केले जात आहे.

### मोहिमेला व्यापक स्वरूप

वसई विरार शहर महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडून मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात २५ हॉटेल, दुकानांना नोटीस देण्यात आली आहे. तसेच या मोहिमेला व्यापक स्वरूप निर्माण व्हावे, यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे.

पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षाचे महत्त्व फार मोठे आहे. यामुळे वृक्षांची देखभाल व संवर्धन करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार नागरिकांना तशा स्वरूपाच्या सूचना देण्यात येत आहेत.
- नयना ससाणे, उपायुक्त तथा अधिकारी वृक्ष प्राधिकरण विभाग

कोरोनामुळे ऑक्सिजनचे महत्त्व सर्वांना कळले; मात्र झाडांचे नाही. झाडे खिळेमुक्त झाली पाहिजेत. महापालिकेने झाडांचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. याला नागरिकांनी जर साथ दिली, तर यश मिळेल.
- अमृता पुरंदरे, आरंभ सामाजिक प्रतिष्ठान

महापालिकेकडून दरवर्षी वृक्षारोपण केले जाते. मात्र ठिकठिकाणी वृक्षांवर खिळे लावून त्यावर पोस्टर, बोर्ड झळकत असतात; तर गॅरेजच्या ठिकाणी झाडांवर टायर लावले जात आहेत. तसेच झाडांच्या संरक्षणासाठी लावल्या जाणाऱ्या पिंजऱ्यात प्लास्टिक व अन्य कचरा असतो. त्याला आगही लावली जाते. यामुळे झाडांचे विद्रूपीकरण होते. परिणामी झाडांची वाढ खुंटते. त्यामुळे वसई-विरार महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकारी व उपायुक्त नयना ससाणे यांनी महाराष्ट्र नागरिक क्षेत्र वृक्ष संरक्षण, जतन अधिनियम १९७५ च्या २०/क प्रमाणे नोटीस देऊन झाडांचे विद्रूपीकरण करणाऱ्यांना नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार वृक्ष प्राधिकरण विभागाचे अधीक्षक नरेंद्र पाटील, वरिष्ठ लिपिक राजेंद्र पाटील, कनिष्ठ अभियंता स्मिता पिंपळे यांच्यासह माळी आदींनी शहरात दुकानदारांना नोटीस देत आहेत.

## मोर्वा मेट्रो कारशेडच्या विरोधावर ग्रामस्थ ठाम

भाईंदर, ता. ३१ (बातमीदार) : भाईंदरजवळील मोर्वा गावालगतच्या प्रस्तावित मेट्रो कारशेडला ठाम विरोध असल्याचे ग्रामस्थांनी सुनावणीतही स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांनी कारशेड स्थलांतर करण्याचे मौखिक आदेश दिले असले, तरी जोपर्यंत यासंदर्भातले लेखी आदेश जारी होत नाहीत, तोपर्यंत कारशेडविरोधात संघर्ष सुरूच राहील, असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.

मोर्वा गावातील शेतजमीन मेट्रो कारशेडसाठी आरक्षित करण्यासाठीच्या नोटिशीवर ग्रामस्थांनी हरकती नोंदवल्या होत्या. त्याची सुनावणी मंगळवारी झाली. या वेळी सुमारे पाचशे ग्रामस्थांसह नगररचना विभागाच्या सहसंचालक, अन्य अधिकारी या सुनावणीला उपस्थित होते. ही सुनावणी बुधवार व गुरुवारपर्यंत सुरू राहणार आहे. सुनावणीला आलेल्या ग्रामस्थांना त्यांनी नोंदवलेल्या लेखी हरकती व्यक्तिरिक्त अन्य काही सांगायचे आहे का, असे विचारण्यात आले. त्या वेळी कारशेडला ठाम विरोध असल्याचेच ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना सांगितले, अशी माहिती स्थानिक रहिवासी रमेश पाटील यांनी दिली.

कारशेडला असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रताप सरनाईक यांनी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत कारशेड सरकारी जागेवर स्थलांतरित करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र जोपर्यंत लेखी आदेश दिले जात नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. लवकरच याबाबत जाहीर सभेचे आयोजन केले जाणार आहे, अशी माहिती कारशेडविरोधी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या भूमिपुत्र सामाजिक समन्वय संस्थेचे अध्यक्ष अशोक पाटील यांनी दिली.

CamScanner

लोकसत्ता ५-५-१.

# मीरा-भाईंदरच्या पोलीस दलात केवळ २५ महिला कर्मचारी

मयुर ठाकूर, लोकसत्ता

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस दलात केवळ पंचवीसच महिला पोलीस कर्मचारी आहेत. महत्त्वाच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात महिला पोलिसांची कमतरता भासत आहे. परिणामी इतर शहरातील महिला पोलिसांची मदत घेतली जात आहे.

पालघर जिल्हा आणि ठाणे ग्रामीण पोलिसांचे विभाजन करून १ ऑक्टोबर २०२० रोजी 'मीरा भाईंदर वसई विरार' पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात होती. त्यावेळी वसई, विरार ७ तर मीरा-भाईंदर शहरात ६ पोलीस ठाणी अस्तित्वात होती. तेव्हा ३ हजार ३३१ पदांना मंजुरी देण्यात आली होती. त्यात ४२६ अधिकारी आणि २ हजार ९०५ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. परंतु २७२ पोलीस अधिकारी आणि १ हजार ३९८ असे मिळून १ हजार ६७० पोलिसांच्या जागा रिक्त होत्या. दोन वर्षात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे भरण्यात आली असली तरी अद्यापही ३० टक्के प्रमाणे महिला पोलिसांसाठी राखीव असलेली ९९९ पदांपैकी फक्त २५३ रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. मीरा-भाईंदर शहरातील सहा पोलीस ठाण्यात ९५ अधिकारी आणि ३६८ पोलीस कर्मचारी कार्यरत आहे. सहाही पोलीस ठाण्यात केवळ एकूण २५ महिला आहेत, अशी माहिती परिमंडळ १ विभागाचे उपायुक्त जयवंत बजबळे यांनी दिली.

## महिला पोलीस महत्त्वाचे का?

भारतीय कायद्यानुसार महिला गुन्हेगारांना अटक करण्यासाठी, महिलांना न्यायालयात घेऊन जाण्यासाठी, पीडित महिलेची तक्रार नोंदवण्यासाठी तसेच महिलांची वैद्यकीय तपासणीसाठी महिला पोलीसच असणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र पोलीस ठाण्यात महिला पोलिसांची कमतरता असल्यामुळे या कामास विलंब होतो. अथवा ते काम उपस्थितीत महिला पोलिसांवर अतिरिक्त भार टाकून पूर्ण करून घेतले जाते.

> **“पोलीस ठाण्यातील महिला पोलिसांची कमतरता पूर्ण करण्यासाठी नव्याने भरती प्रक्रिया राबवली जात आहे. मात्र सध्या आवश्यक काम असल्यास इतर पोलीस ठाण्यातून महिला पोलिसांची मदत घेऊन काम पूर्ण केले जात आहे.**
>
> - जयवंत बजबळे, उपायुक्त,परिमंडळ १ (मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय)

लोकमत ५-५-१.

# कुंटणखाना चालवणाऱ्या दोघांना ठोकल्या बेड्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या भाईंदर शाखेने वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या दोघांना अटक केली आहे. जिनत खांन (रा. मालाड, मालवणी) ही वेश्या व्यवसायासाठी तरुणी पुरविण्याचे काम मोबाइल आणि व्हॉट्सॲपद्वारे करते. तसेच गिऱ्हाईकास लॉजमध्ये खोली बुक करायला सांगून तेथे तरुणी पुरविते, अशी माहिती पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळाली. त्यानुसार अहिरराव यांच्यासह उमेश पाटील, केशव शिंदे, सम्राट गावडे, आफ्रिन जुन्नेदी यांच्या



पथकाने सापळा रचून वेश्या दलाल जिनत हिला मीरा रोडच्या रामदेव पार्क भागातील लॉजजवळ बोलावले. तिचा साथीदार रिक्षाचालक सद्दाम नसीम हुसेन (२५, रा. साकिनाका, अंधेरी) हा तरुणीस लॉजमध्ये पाठविण्यासाठी घेऊन आला. ठरलेली रक्कम सद्दाम याने स्वीकारताच पोलिसांनी त्याला आणि जिनत या दोघांना पकडले.

CamScanner

लोकसत्ता ५-५१-८.

# बेकायदा बंदूक बाळगणारे दोघे अटकेत

## एक आरोपी गोळीबार प्रकरणातील

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** बेकायदा बंदूक बाळगल्याप्रकरणी विरार पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. त्यातील एक आरोपी हा विरारच्या कण्हेर फाटा येथे तरुणावर झालेल्या गोळीबार प्रकरणातील एका फरार आरोपी असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

विरारच्या कण्हेर फाटा येथे २५ नोव्हेंबरला एका तरुणाला वैयक्तिक वादातून मारहाण करण्यात आली होती. या वेळी मारहाण करणाऱ्या आरोपींनी हवेत गोळीबारही केला होता. याप्रकरणी मांडवी पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर गोळीबार करणारा मुख्य आरोपी हा फरार झाला होता.

माघी गणेशोत्सव विसर्जनादरम्यान विरार पूर्वेच्या बरफपाडा येथील परिसरात शस्त्र विक्रीसाठी काही जण येणार असल्याची माहिती विरार पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून शस्त्र विक्री करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली आहे.

प्रशांत ऊर्फ पाशा पाटील (२७), हेमंत पाटील (२४), असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून बंदूक जप्त करण्यात आली आहे. यातील प्रशांत हा मांडवी गोळीबार प्रकरणातील फरार आरोपी होता. त्याच्यावर मांडवी व वाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. तर, हेमंत याच्यावर विरार व अर्नाळा पोलिसांत गुन्हे दाखल आहेत. या आरोपींनी शस्त्र कुठून आणले, याचा आम्ही तपास करीत आहोत, असे विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी सांगितले.

लोकसत्ता ५-५१-९.

# श्रद्धा वालकर हत्येचा तपास लावणारे माणिकपूर पोलीस उपेक्षित

## 'सर्वोत्कृष्ट तपासा'च्या यादीतून डावलले

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या श्रद्धा वालकर हत्येचा तपास करणाऱ्या माणिकपूर पोलिसांच्या पदरी निराशा पडली आहे. पोलीस आयुक्तालयातर्फे दर महिन्याला दिल्या जाणाऱ्या 'सर्वोत्कृष्ट तपासा'च्या पुरस्कारातून माणिकपूर पोलिसांना वगळण्यात आले आहे. यामुळे पोलिसांनी नाराजी व्यक्त केली आहे.

वसईत राहणाऱ्या श्रद्धा वालकर या तरुणीची तिचा प्रियकर आफताब पूनावाला याने मे २०२२ रोजी दिल्लीमध्ये हत्या केली. तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करून ते जंगलात फेकून दिले. या प्रकरणाचा तपास दिल्ली पोलीस करत असले, तरी सुरुवातीला माणिकपूर पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासामुळेच या हत्येला वाचा फुटली.

माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तांत्रिक पुरावे गोळा केले आणि ५ दिवस दिल्लीत जाऊन केलेल्या तपासामुळेच दिल्ली पोलिसांनी आफताबला अटक केली आणि देशाला हादरवून टाकणारा हा गुन्हा उघडकीस आला. त्यामुळे माणिकपूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होऊ लागले होते. परंतु माणिकपूर पोलिसांच्या या तपासाची दखल पोलीस आयुक्तांकडून घेण्यात आली नाही. दर महिन्याला आयुक्तांकडून उत्कृष्ट तपास करणाऱ्या पोलिसांचा सन्मान करण्यात येतो.

पोलीस आयुक्तांकडून प्रशस्तीपत्रक देण्यात येते. डिसेंबर महिन्यातील सर्वोत्कृष्ट पोलीस तपास करणाऱ्यांची नावे जाहीर झाली तेव्हा माणिकपूर पोलिसांचे नाव आले नाही. त्यामुळे डिसेंबर महिन्याच्या यादीत नाव येईल अशी पोलिसांना आशा होती. मात्र त्या यादीतही माणिकपूर पोलिसांचे नाव नव्हते. त्यामुळे माणिकपूर पोलिसांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मुंबई

पुण्यनगरी

# In Short

## फसवणूक करणाऱ्या आरोपीस अटक

मीरा रोड : नवघर पोलीस ठाणे हद्दीत एका व्यक्तीने फर्निचर बनवण्याचे काम देतो, असे सांगून एका व्यक्तीची ३१ हजार रुपयांची फसवणूक केली होती. फसवणूक करणाऱ्या आरोपीस नवघर पोलिसांनी अटक केली आहे. अर्जुन रामलखन विश्वकर्मा यांना २१ जानेवारी रोजी अरविंद गुप्ता याने मोबाईलवरून संपर्क करून मीरा रोड येथील हॉटेलच्या फर्निचरचे काम देतो, असे सांगितले. त्यानुसार विश्वकर्मा हे अरविंद गुप्ता यांना भेटले असता त्याने त्यांची ओळख संतोष पांडे यांच्याशी करून दिली. त्या वेळी हॉटेलमध्ये १५० बेडचे व कपाटांचे काम असल्याचे सांगून त्यांच्याकडून ॲग्रीमेंट करावे लागेल, असे कारण सांगून प्रथम ११,३०० रु. घेतले तसेच काम मिळवण्यासाठी ५०,००० रु. खर्च येईल, असे सांगून दुसऱ्या वेळेस २०,००० रु. संतोष पांडे याने घेऊन त्यांना फर्निचर बनवण्याचे काम न देता व त्यांनी दिलेले पैसे परत न करता त्यांची फसवणूक केली. त्यामुळे विश्वकर्मा यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी संतोषकुमार ऊर्फ पन्नालाल बुधीराम पांडे यास वसई येथून अटक केली.

Smart Mumbai Edition
Jan 29, 2023 Page No. 01
Powered by : eReleGo.com

CamScanner

पुण्य नगरी

# वर्षभरात वाहन चोरीचे ३८३ गुन्हे उघडकीस

मीरारोड : मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये २०२२ या पूर्ण वर्षभरात मोठ्या प्रमाणात दुचाकी व चारचाकी वाहन चोरी झाल्याचे प्रकार उघडकीस आले आहे. २०२२ या वर्षभरात वाहन चोरीचे झाल्याचे ८४४ गुन्हे दाखल झाले असून, त्यापैकी ३८३ गुन्हे उघडकीस आले आहेत, तर २०२१ या वर्षात ८६९ गुन्हे दाखल असून ३१९ गुन्हे उघडकीस आले आहेत.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तलयाच्या हद्दीमधील काशिमीरा, नयानगर, माणिकपूर, वालीव,पेल्हार या पोलीस ठाण्यांमध्ये वाहन चोरींचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण जास्त असून, दाखल गुन्ह्यांची संख्यादेखील जास्त आहे. नवघर, मीरा रोड, उत्तन, भाईंदर, वसई, नालासोपारा, अर्नाळा, मांडवी, आचोळे, तुळिंज या पोलीस



ठाण्यांमध्ये उघडकीस आलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण कमी आहे.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्वात जास्त वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. एक कॅमेरा शहरासाठी या पोलिसांच्या संकल्पेतून शहरात जास्तीत जास्त कॅमेरे बसवण्यात आल्याने वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. तरीदेखील गेल्या वर्षभरात ८४४ वाहने चोरी झाल्याचे गुन्हे दाखल असून, त्यातील फक्त ३८३ वाहन चोरींचे गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले आहेत. २०२१ व २०२२ या दोन्ही वर्षांत दाखल असलेले गुन्हे व उघड आणलेल्या गुन्ह्यांची आकडेवारी पाहता २०२२ या वर्षात पोलिसांनी वाहन चोरीचे जास्त गुन्हे उघडकीस आणले आहेत. उर्वरित गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस प्रयत्न करत असून, लवकरच वाहन चोरीचे सर्व गुन्हे उघडकीस आणले जातील, असे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे.

Smart Mumbai Edition
Jan 30, 2023 Page No. 04
Powered by : ePaperGo.com

CamScanner

समय भास्कर

# शहर मे सड़क पर फैला तेल, गिरने लगे वाहन सवार

## ट्रैफ़िक कर्मचारी का सराहनीय कार्य



पंकज दुबे/ मीरा-भाईंदर। मुंबई से सटे मीरा-रोड के प्लेज़ेंट पार्क में सुबह लगभग 10:00 बजे सड़क पर कुछ दुरी तक तेल फैल गया जिससे यातायात बाधित हुई, साथ ही कुछ बाइक सवार इस तेल की वजह से सड़क पर गिर गये, और उन्हें मामूली चोटे भी आयी 7 इसी जगह पर कार्यरत ट्रैफिक विभाग के कर्मचारी पंकज ठाकुर ने समय रहते फायर ब्रिगेड को फोन किया और मिट्टी तथा अन्य चीजों से इस पर काबू पाया गया। ज्ञात हो कि मेट्रो कार्य की वजह से मीरा-भाईंदर रोड पर सड़क की चौड़ाई वाहनों के लिए पहले से ही कम है, इस गिरे तेल की वजह से यातायात प्रभावित ना हो, इसलिए पंकज ठाकुर ने खुद हाथों मे मिट्टी लेकर सड़क पर डालें।

सड़क पर फैले इस तेल के गिरने के बारे मे कोई जानकारी नहीं मिल पायी है, पर शायद ट्रैफिक कर्मचारी कि वजह से अनहोनी टल गई।

CamScanner

समय भास्कर

# मामूली झगड़े में गई मासूम की जान, हत्या के आरोप मे 9 गिरफ्तार

## अविराज कुराडे एंड टीम को लगे महज 4 घंटे

पंकज दुबे/ मिरा-भाईंदर

मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले क्राइम ब्रांच यूनिट -1 ने मीरा रोड में हुए हत्या के मामले को सुलझा लिया है, ज्ञात हो कि 30 जनवरी को जांगिड़ सर्कल के पास कुछ अज्ञात लोगों ने 20 वर्षीय अंकुश राज की हत्या कर दी थी।

पुलिस ने यह हत्या का मामला महज 4 घंटे में सुलझा लिया है, प्रेस वार्ता में क्राइम ब्रांच के पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ने बताया कि झगड़े की शुरुआत गाड़ी को आगे-पीछे करने के लिए पेट्रोल पंप पर हुई, फिर बात हाथापाई से



लेकर हत्या तक पहुंच गयी। अविनाश अंबुरे ने बताया कि सभी आरोपियों को गिरफ्तार कर पुलिस आगे की कार्रवाई कर रही है, उन्होंने बताया कि आगे की जांच में पता चलेगा कि किस हथियार से मृतक की हत्या की गई, और कहीं इनके अलावा कोई और भी इस मामले में लिप्त तो नहीं। क्राइम ब्रांच यूनिट-1 ने इसके पहले भी 28 साल पहले हुई हत्या के एक मामले को सुलझाया था, जहां आरोपी को 28 साल के बाद हत्या के आरोप में गिरफ्तार कर लिया गया था । यह कार्य क्राइम ब्रांच के पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक आयुक्त अमोल मांडवे के मार्गदर्शन में काशीमीरा क्राइम ब्रांच यूनिट 1 के पुलिस निरीक्षक अविराज कुराडे, कैलाश टोकले, राजू तांबे, संजय पाटिल, विनोद राउत, संजय शिंदे आदि ने किया।

CamScanner

# झारखंडमध्ये ऑनलाईन फसवणुकीचे धडे

## मुंबई, पुण्यातील ७ लाख बँक खातेदारांचा डाटा लिक

■ जि. प. शाळेचा मुख्याध्यापक गजाआड

ठाणे : पुढारी डेस्क

झारखंड राज्यात ऑनलाईन फसवणुकीचे धडे देणाऱ्या जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाला गजाआड करण्यात आले आहे. सदर कारवाई मुंबई पोलीस दलाच्या माटुंगा पोलिसांनी झारखंडमध्ये केली. आरोपी मंजितकुमार आर्या (३१, रा. जि. देवघर, झारखंड) याच्या अटकेपूर्वी पोलिसांनी त्याच्या तीन शिष्यांना तुरुंगात धाडले आहे. नागरिकांना लुटण्यात शातीर असलेल्या या आरोपीकडून मुंबई व पुणे शहरातील दोन नामांकित बँकांच्या ७ लाख ६५० खातेदारांचा डाटा व लॅपटॉप, चेकबुक, ६ डेबिट कार्ड जप्त करण्यात आले, अशी माहिती मंगळवारी दै. 'पुढारी'ला पोलीस सूत्रांनी दिली.

माटुंग्यातील वसंत छेडा (६४) यांना केव्हायसी नसल्याने बँक खाते ब्लॉक झाल्याचा मेसेज पाठवण्यात आला होता. खाते ब्लॉक होईल या भीतीपोटी त्यांनी मेसेजमधील लिंकवर क्लिक करता बँकेची वेबसाईट ओपन झाली. त्यावर वैयक्तिक माहिती भरताच छेडा यांच्या बँक खात्यातून १ लाख ९ हजार ९९९ रुपये ट्रान्स्फर झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी माटुंगा पोलीस ठाणे गाठले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू असताना आरोपीने छेडा यांच्या पैशांनी दिल्लीतील एका नामांकित दुकानात खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांचे पथक दिल्लीत रवाना झाले. प्राप्त माहितीच्या आधारे परिमंडळ ४ चे उपायुक्त डॉ. प्रवीण मुंढे, एसीपी संजय जगताप, वपोनि दीपक चव्हाण, पोनि (गुन्हे) सुभाष शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दिगंबर, पगार, अंमलदार संतोष पवार, मंगेश जऱ्हाड यांनी पोलिसांनी सैफ अली उसमान (२३), मो. कलाम मो. सोहराब अन्सारी (२२, दोघेही रा. दिल्ली) यांच्या मुसक्या आवळल्या. या दोघांची कसून चौकशी केली असता त्यांनी झारखंडच्या आरोपीची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी अरुणकुमार मंडळ (२४) याला अटक केली. पोलीस कोठडीदरम्यान पोलिसांनी तिघांची कसून चौकशी केली असता त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या मंजितकुमार आर्या याचे नाव उघडकीस आले. त्यानुसार त्यालाही बेड्या ठोकण्यात आल्या.

### ३६०० जणांना पाठवल्या लिंक



विद्युत बिल भरा अन्यथा वीजपुरवठा बंद होईल, केव्हायसी करा नाहीतर बँकेचे व्यवहार करता येणार नाहीत, अशा आशयाचे मेसेज मुंबई, पंजाब व बंगळुरूमधील ३ हजार ६०० नागरिकांना लिंक पाठवल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. या टोळीचा पर्दाफाश झाल्याने अनेक गुन्हे उजेडात येण्याची शक्यता माटुंगा पोलिसांनी वर्तली असून त्या अनुषंगाने पुढील तपास पोलीस करत आहेत.

Thane Edition
Feb 1, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

CS CamScanner

# तुलिंज पुलिस स्टेशन में चिकित्सा शिविर

**निसं, नालासोपारा :** सामाजिक संस्था कृपा फाउंडेशन ने तुलिंज पुलिस स्टेशन में चिकित्सा शिविर आयोजित किया। शिविर में ब्लड टेस्ट, ईसीजी, आंखों की जांच सहित कई बीमारियों की मुफ्त जांच की गई। डॉक्टरों ने कहा कि काम में व्यस्त होने से पुलिस कर्मी अपने स्वास्थ्य पर ध्यान नहीं दे पाते, इसलिए इस शिविर का आयोजन किया गया। लगभग 70 पुलिस कर्मियों ने मुफ्त जांच शिविर का लाभ उठाया।

CS CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-228 मुंबई, बुधवार 1 फरवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# अनधिकृत निर्माण मामले में 12 लोगों पर एमआरटीपी दर्ज

**वसई :** विविसीएमसी प्रभाग 'जी' द्वारा 12 लोगो के वालीव पुलिस स्टेशन में एमआरटीपी के तहत एफआईआर दर्ज करवाया है।गौरतलब है कि संबंधित कार्यो में सहयोग प्रभाग 'जी' के लिपिक सुनील तेलगोटे,विशाल आरुषकर व सुशान्त किनी ने की है।जानकारी के अनुसार, विविसीएमसी कमिश्नर अनिलकुमार पवार व अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले के आदेशानुसार उपायुक्त (अतिक्रमण विभाग ) अजित मुठे के मार्गदर्शन में विविसीएमसी के विभिन्न प्रभागो में अवैध निर्माणों पर तोड़क कार्रवाई की जा रही है। इसी क्रम में प्रभाग 'जी' की सहायक आयुक्त धनश्री शिंदे ने वालीव थाने में 12 लोगो पर एमआरटीपी दर्ज करवाई है।बताया गया है कि सर्वे नं.41/2,43 और सर्वे नं.97 हिस्सा नं.16/2 में गाला धारक व जमीन मालिक द्वारा अनधिकृत निर्माण बांधकाम किया, इस मामले में अतिक्रमण विभाग द्वारा गाला धारक व जमीन मालिक को नोटिस भी जारी कर बांधकाम हटाने का निवेदन दिया था,फिलहाल सहायक आयुक्त धनश्री शिंदे ने पिछले दिनों वालीव थाने में ओमप्रकाश मेहता (जमीन मालिक ),नटवरसिंह राव,हितेश पाल,दिनेश पाल,मंचन जैन,धर्मेंद्र मकवाना,राजू विश्वकर्मा,पृथ्वीराज चेरीया,जीतूभाई,राजू परमार व गाला क्र.2 व 8 और अब्दुल सत्तार खेरूउद्दीन सोलंकी के ऊपर एमआरटीपी के तहत केस दर्ज करवाया है।

CS CamScanner

MHT
मुंबई
# हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, बुधवार 1 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

स्टंटबाजों और वाहन मालिकों की खैर नहीं ...पेज-3

शिखर पहाड़िया को डेट कर रही हैं जान्हवी कपूर ...पेज-6

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, माघ शुक्ल पक्ष एकादशी | 07.13 am / 06.31 pm | [illegible] | अधिकतम 32°C / न्यूनतम 23°C | NSE Open 17,731.45 \| Close 17,662.15; BSE Open 59,101.69 \| Close 59,500.41 | Rs. 57,270 Per 10 gm / Rs 72,300 Per Kg |

# स्टंटबाजों और वाहन मालिकों की खैर नहीं

## वाहन मालिक को 5000 जुर्माना और कारावास

संवाददाता MHT
राकेश सिंह

नालासोपारा। आज कल देखा जा सकता है कि अपने आप को रहीस दिखाने के लिए कुछ माता-पिता अपने नाबालिग बच्चों को बाईक, स्कूटी या कार चलाने के लिए थमा देते हैं, जिससे उनके बच्चों के साथ-साथ सड़क और फुटपाथ पर चलने वालों के लिए भी जानलेवा होता है। तो सामाजिक और कानून दोनों रुप से गलत है। जिस देखते हुए अब वसई-विरार पुलिस नाबालिग वाहन चालक और वाहन मालिक के खिलाफ भी कार्रवाई करने की तैयारी कर रही है।



### क्या कहता है कानून

कानून के मुताबिक नाबालिग को वाहन चलाते पकड़े जाने पर 5,000 रुपये का जुमार्ना लगाया जाता है। इसलिए अपने बच्चों के हाथ में वाहन छोड़ना नियमानुसार गलत है। नियमानुसार 18 वर्ष की आयु पूरी करने के बाद लाइसेंस या शिक्षार्थी लाइसेंस प्राप्त करने के बाद ही ड्राइविंग की अनुमति है।

### माता-पिता भी हैं जिम्मेदार

देश में सड़क हादसों की बढ़ती संख्या पर लगाम लगाने के लिए केंद्र सरकार ने ट्रैफिक नियमों के उल्लंघन पर जुमार्ने की राशि बढ़ा दी है। साथ ही कानून के तहत, यदि कोई नाबालिग वाहन चला रहा है, तो ऐसे नाबालिग के माता-पिता या मोटर वाहन के मालिक को दोषी माना जाएगा। सुबह शहर के स्कूलों और कॉलेजों का भ्रमण करते हुए युवाओं के साथ-साथ नाबालिग भी 'धूम' स्टाइल की तेज रफ्तार बाइकों पर स्टंट करते नजर आए।

### उम्र से कम होने पर पांच हजार का जुमार्ना

युवा में दुर्घटनाओं की घटनाएं दिन-ब-दिन बढ़ती जा रही हैं। तेज रफ्तार के उनके जुनून के कारण ही परिवार को आर्थिक और मानसिक तनाव होता है। बहुत से लोग ऐसे हादसों से स्थायी रूप से स्थिर हो जाते हैं। जिससे उनका भविष्य बर्बाद हो जाता है। युवाओं को बिना लाइसेंस के बाइक नहीं चलानी चाहिए और माता-पिता को इस गैरजिम्मेदाराना रवैये पर अंकुश लगाने के लिए काम करना चाहिए। कम उम्र और बिना लाइसेंस के दोपहिया वाहन चलाने पर पांच हजार तक का जुमार्ना और कारावास दोनों हो सकता है। यह जुमार्ना संबंधित वाहन मालिक या बच्चों के अभिभावक पर लगाया जाता है। इसके अलावा दुर्घटना होने पर माता-पिता पर भी नियमानुसार मुकदमा दर्ज किया जाता है।



"यदि बच्चे के हाथ में लाइसेंस नहीं है तो माता-पिता को वाहन नहीं देना चाहिए। अगर बच्चों के हाथों कोई दुर्घटना होती है, तो माता-पिता के खिलाफ भी कार्रवाई हो सकती है।

-प्रशांत लांगी (वरिष्ठ पुलिस निरीक्षक, ट्रैफिक विभाग- विरार)

CS CamScanner

स्टंटबाजों और वाहन मालिकों की खैर नहीं ...पेज-3

MHT

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

# मुंबई हिंदमाता टाइम्स

शिखर पहाड़िया को डेट कर रही हैं जान्हवी कपूर ...पेज-6

मुंबई, बुधवार 1 फरवरी 2023

| RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com |

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| संवत् 2079, माघ शुक्ल पक्ष एकादशी | 07.13 am / 06.31 pm | | अधिकतम 32°C / न्यूनतम 23°C | NSE / BSE | |


# 12 लोगों पर एमआरटीपी के तहत मामला दर्ज



वसई। बार-बार अवैध निर्माण करने वाले व्यक्तियों और ठेकेदारों के नामों की मनपा एक विशेष डायरी बनाने जा रही है। इस संदर्भ में जारी सर्कुलर में कहा गया है कि हर महीने में इस डायरी में दर्ज नामों की समीक्षा वरिष्ठ अधिकारियों द्वारा की जाएगी, जिसके बाद संबंधित व्यक्ति पर पुलिस में मामला दर्ज कराया जाएगा। एक अधिकारी ने कहा कि समय-समय पर होने वाली समीक्षा से अवैध निर्माण करने वाले खास लोगों पर शिकंजा कसेगा। ऐसे में वसई-विरार शहर महानगरपालिका अवैध निर्माणों पर तोड़क कार्रवाई कर रही है। वहीं विविसीएमसी प्रभाग "जी" द्वारा 12 लोगों के वालीव पुलिस स्टेशन में एमआरटीपी के तहत एफआईआर दर्ज करवाया है।

## विविसीएमसी कमिश्नर के आदेश पर एक्शन

प्रभाग "जी" की सहायक आयुक्त धनश्री शिंदे ने वालीव थाने में 12 लोगों पर एमआरटीपी दर्ज करवाई है। बताया गया है कि सर्वे नंबर 41/2,43 और सर्वे नं.97 हिस्सा नं.16/2 में गाला धारक व जमीन मालिक द्वारा अनधिकृत निर्माण बांधकाम किया, इस मामले में अतिक्रमण विभाग द्वारा गाला धारक व जमीन मालिक को नोटिस भी जारी कर बांधकाम हटाने का निवेदन दिया था। फिलहाल सहायक आयुक्त धनश्री शिंदे ने पिछले दिनों वालीव पुलिस स्टेशन में ओमप्रकाश मेहता (जमीन मालिक), नटवरसिंह राव, हितेश पाल, दिनेश पाल, मंचन जैन, धमेंद्र मकवाना, राजू विश्वकर्मा, पृथ्वीराज चेरीया, जीतूभाई, राजू परमार व गाला क्रमांक 2 व 8 और अब्दुल सत्तार खेरूउद्दीन सोलंकी के ऊपर एमआरटीपी के तहत मामला दर्ज करवाई है।

पुलिस ने शिकायत के आधार पर उक्त लोगों पर एमआरटीपी दर्ज कर लिया है।

## जारी है अवैध निर्माण

अवैध निर्माण की समस्या से मनपा लंबे समय से परेशान है। पिछले साल भोईदा पाड़ा में हुआ हादसा इसका ज्वलंत उदाहरण है। इस संदर्भ में कोर्ट ने भी कई बार फटकार लगाई है। कई बार तो अवैध निर्माण तोड़ने के बाद फिर से वहां निर्माण कर लिया जाता है।

## सख्त कार्रवाई पर जोर

अतिक्रमण निर्मूलन वॉर्ड ऑफिसर उपायुक्त अजित मुठे ने कहा कि हमने नया सर्कुलर टीम सियुसी गठित किया है। हमारा जोर अवैध निर्माण करने वालों पर सख्त कार्रवाई को लेकर होगा।

CS CamScanner